# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ६ नोव्हेंबर २०१९**

# कर संग्राहकांना एका ‘क्लिक’वर मिळणार मालमत्ता कराची माहिती

## मनपाने तयार केले ॲप्लिकेशन : देशातील पहिली महानगरपालिका

**नागपूर, ता. ६ :** नागपूर महानगरपालिकेत कार्यरत कर संग्राहकांसाठी आनंदाची बातमी आहे. कर संग्राहकांना आता त्यांच्या परिसरातील करदात्यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होईल, असे ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. यामुळे फाईलचा गठ्ठा घेऊन फिरणाऱ्या कर्मचाऱ्यांचा भार हलका होणार आहे. नव्या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून ॲन्ड्रॉईड मोबाईल फोनवर कर्मचाऱ्यांना संपूर्ण डाटा उपलब्ध राहील. अशा

प्रकारचे ॲप्लिकेशन तयार करणारी नागपूर महानगरपालिका ही देशातील पहिली महापालिका ठरली आहे.

कर विभागाचे सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम याबाबत माहिती देताना म्हणाले, सदर मोबाईल ॲप्लिकेशनचे नाव 'टॅक्स मॉनिटरींग सिस्टीम' असे आहे. हे ॲप्लिकेशन मार्स टेलिकॉम लिमिटेड कंपनीने तयार केले आहे. हे एक जीआयस बेस्ड् ॲप्लिकेशन असून त्यावर लॉग-इन करताच मालमत्ता धारकांकडे मालमत्तेचा किती कर आणि किती वर्षांपासून शिल्लक आहे, मालमत्तेचा सध्याचा उपयोग काय आहे, आदीबाबत माहिती उपलब्ध राहील. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून बहुमजली इमारतीची माहितीही तात्काळ उपलब्ध होऊ शकेल. कर्मचारी जसे लॉग-इन करेल, त्याची माहिती मालमत्ता कर विभागाला प्राप्त होईल.

सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम पुढे म्हणाले, जर कुठल्या मालमत्तेचा कर बकाया असेल तर त्याची माहिती लाल रंगात दिसेल. ज्या मालमत्तेचा संपत्ती कर अदा झाला असेल ती माहिती हिरव्या रंगात दिसेल. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून मालमत्तेशी संबंधित सर्व माहिती एका क्लिकवर प्राप्त होईल. कर निर्धारण झाले नसलेल्या मालमत्तेची माहितीही यामध्ये उपलब्ध असेल. निवासी, गैरनिवासी, व्यावसायिक संपत्ती वेगवेगळ्या रंगात दिसेल. कर विभागातील कर्मचाऱ्यांना यूजर आयडी आणि पासवर्ड देण्यात आला आहे.

नागपूर शहरात ६.५० लाख मालमत्ता आहेत, ज्यापैकी ५.७८ लाख मालमत्तेची माहिती ॲप्लिकेशनमध्ये अपलोड करण्यात आली आहे. उर्वरीत मालमत्तांची माहिती अपलोड करण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. यामाध्यमातून संपूर्ण वॉर्डात किती मालमत्ता धारकांकडे किती बकाया आहे, याचीही माहिती ॲप्लिकेशनच्या माध्यमातून प्राप्त होईल.

उल्लेखनीय असे की, मालमत्ता कर विभागाने संपूर्ण शहराला ७७ वॉर्डामध्ये विभाजित केले आहे. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून कर विभागाच्या कार्याला गती प्राप्त होईल आणि वसुलीत मदत होईल, अशी माहिती सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी दिली.

-----------

नागपुर महानगर पालिका के कर संग्राहको के लिए यह खुशखबरी है की अब उन्हें संपत्ति कर विभाग से सम्बंधित जानकारी प्राप्त करने के लिए फाइल का गड्डा लेकर घूमना नहीं पड़ेगा. सम्पति कर विभाग ने एक ऐसे मोबाइल एप्लीकेशन तैयार की है जिसकी मदद से उनको सम्पति का ब्यौरा तत्काल एंड्राइड मोबाइल पर प्राप्त हो सकेगा. नागपुर महानगर पालिका सम्भवत देश की पहली महानगर पालिका है जिसके पास यह अत्याधुनिक मोबाइल ऍप्लिकेशन है.

सम्पति कर विभाग के प्रमुख, सहायक आयुक्त श्री मिलिंद मेश्राम ने बताया की इस मोबाइल एप्लीकेशन का नाम टैक्स मॉनिटरिंग सिस्टम है. इसे मार्स टेलीकॉम लिमिटेड कंपनी ने तैयार किया है. यह एक GIS बेस्ड एप्लीकेशन है जिसे लॉगिन करते ही सम्पति धारको के मकान का कर कितना बकाया है, कितने वर्षो से बकाया है तथा सम्पति का वर्त्तमान उपयोग क्या है तथा विभाग के रेकॉर्ड में क्या जानकारी दर्ज है। इसमें बहुमंजली इमारतों की भी जानकारी तत्काल प्राप्त हो सकेगी. कर्मचारी जैसे ही लॉगिन करेगा तो उसकी जानकारी सम्पति कर विभाग में मिल जाएगी.

श्री मेश्राम ने बताया की यदि किसी का सम्पति कर बकाया है तो उनकी जानकारी लाल रंग में प्रदर्शित होगी जबकि जिसने सम्पति कर भर दिया है उनकी जानकारी हरे रंग में नजर आएगी. इसके लिए सम्पति कर विभाग के कर्मचारियों को यूजर ID तथा पासवर्ड दिया जायेगा. इस एप्लीकेशन के माध्यम से सम्पति से सम्बंधित सारी जानकारी एक क्लीक पर प्राप्त होगी. बिना कर निर्धारण वाली सम्पति की भी जानकारी इस एप्लीकेशन के माध्यम से प्राप्त होगी. निवासी,

गैर निवासी तथा व्यावसायिक सम्पति अलग - अलग रंगो में नज़र आएगी.

नागपुर शहर में ६. ५० लाख सम्पति है जिसमे से ५. ७८ लाख सम्पति की जानकारी अपलोड की जा चुकी है जबकि बाकी सम्पति की जानकारी को अपलोड करने का कार्य जारी है. इस एप्लीकेशन के माध्यम से पूर्ण वार्ड में कितने सम्पति धारको पर कितना बकाया है इसकी भी जानकारी प्राप्त होगी. उल्लेखनीय है की सम्पति कर विभाग ने संपूर्ण शहर को ७७ वार्डो में विभाजित किया है. श्री मेश्राम को विश्वास है की इस एप्लीकेशन के माध्यम से विभाग के कार्य में गति आएगी और वसूली होने में मदद मिलेगी.